नव राष्ट्र

# स्वच्छता कामगारांना औषधांचे वाटप

पुणे : कोविड-१९ विरुद्ध आपले जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या डॉक्टर्स, नर्सेस, पोलिस कर्मचारी, स्वच्छता कामगार यांना क्विक हील व श्री विश्ववती आयुर्वेदीक चिकित्सालय व संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जवळजवळ १ लाख कोविड योद्धयांना रस माधव वटी या रोगप्रतिकारशक्तीवर्धक औषधाचे वाटप करण्यात आले आहे. श्रीविश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय आणि संशोधन केंद्राशी सहकार्य करण्यात आम्हाला आनंद होत आहे. देशासाठी लढणाऱ्या योद्धयांच्या संरक्षणासाठी असे आणखी संभाव्य पुढाकार घेत राहू, अशी माहिती क्विक हील टेक्नॉलॉजिजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलाश काटकर यांनी दिली.

Navarashtra Pune Edition
3 July, 2020 Page No. 2